January 2024

# श्रमसंस्कार शिबिरांतून जगण्याचे तंत्र शिका

## शरद लाड : सांडगेवाडी येथे शिबिराचा समारोप, ग्रामपंचायतीचे सहकार्य



दै. सकाळ दि. ०२/०१/२०२४

January 2024

# अभ्यासाबरोबर श्रमाचे महत्व समजून घ्या : शरद लाड

वार्ताहर
कुंडल

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच श्रमाचे महत्व समजून घेणे गरजेचे आहे. याकरिता श्रमसंस्कार शिबिरे महत्वाची असल्याचे मत क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड सह. साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड यांनी व्यक्त केले. ते सांडगेवाडी (पलूस) येथे क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी सांडगेवाडीचे सरपंच अमर वडार, उपसरपंच सुनिल सूर्यवंशी, शशिकांत सांडगे, प्राचार्य डॉ.आर. एस.डुबल, ज्येष्ठ प्रा.डॉप्रताप लाड आदी मान्यवर उपस्थित होते.

शरद लाड म्हणाले, काही गोष्टी पुस्तकात शिकविल्या जातात मात्र समाजात जगण्याचे तंत्र राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कारामधून शिकविले जाते. भारताचा सुजाण नागरीक घडण्यासाठी श्रमसंस्कार




**कुंडल : विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना क्रांतीचे चेअरमन शरद लाड यावेळी उपस्थित मान्यवर.**

शिबिरे महत्वाची आहेत. शिबिरावेळी स्वच्छता करताना मनाचीही स्वच्छता या शिबिराच्या माध्यमातून होत असते. भारताचा सुजाण नागरीक घडण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच श्रमाचे महत्व समजून घेणे गरजेचे आहे. काम करताना झोकून देऊन काम केल्यास आनंदाबरोबरच केलेल्या कामाचे समाधान ही मिळत असते. सांडगेवाडी ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी शिबिरासाठी मदत केली. असेच सहकार्य महाविद्यालयास पुढील काळातही रहावे.

सुनिल सांडगे म्हणाले, चांगल्या कामासाठी कोणाचा तरी हातभार लागत असतो. आमच्या गावाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून यासाठी आपल्या महाविद्यालयाचा खारीचा वाटा आहे.

प्राचार्य डॉ.आर.एस.डुबल म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना श्रमाबरोबरच संस्काराचीही शिदोरी मिळते.

यावेळी ज्येष्ठ नेते तानाजी शिंदे, सतिश शिंदे, अरुण शिंदे, गणेश भिंगारदिवे, किरण माळी, उत्कर्षा पवार, आशा सूर्यवंशी, शोभा सांडगे, दिनेश सूर्यवंशी, अमोल पवार, आनंदराव पाटील, शिवाजी सांडगे, अशोक सांडगे, प्रशांत सांडगे, दत्तात्रय ढोपे, तानाजी शिंदे, राजाराम वडार, अशोक सांडगे, शिवाजी सांडगे, विजय काशिद, विष्णु सूर्यवंशी, दिनेश सूर्यवंशी, अमोल पवार, मिरा जाधव,शितल तरटे, कल्पना वडार, महिला बचत गटाच्या महिला यांचेसह विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, ग्रामस्थ, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

सोहेल नदाफ, उत्कर्षा चव्हाण, पुजा कदम, वैष्णवी जमदाडे, या विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. तर श्रमसंस्कार शिबिरासाठी सहकार्य करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा सत्कार झाला.

### राष्ट्रीय शिबिरासाठी पायल जाधवची निवड

महाविद्यालयाची विद्यार्थिनी पायल जाधव हिची राष्ट्रीय सेवा योजनेच्या गडचिरोली येथे होणाऱ्या राष्ट्रीय कँपसाठी निवड झाली. शरद लाड यांच्याहस्ते तिचा सत्कार झाला.

दै. तरुण भारत
दि. 02/09/202४

January 2024

# श्रमाचे महत्त्व समजण्यासाठी शिबिरे महत्त्वाची

## शरद लाड : सांडगेवाडीत डॉ. लाड महाविद्यालयाच्या शिबिराची सांगता

**कुंडल : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच श्रमाचे महत्त्व समजून घेणे गरजेचे आहे. याकरिता श्रमसंस्कार शिबिरे महत्त्वाची आहेत, असे मत क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड साखर कारखान्याचे अध्यक्ष शरद लाड यांनी व्यक्त केले.

सांडगेवाडी (पलूस) येथे क्रांतिअग्रणी लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सांडगेवाडीचे सरपंच अमर वडार, उपसरपंच सुनील सूर्यवंशी, तंटामुक्तीचे अध्यक्ष शशिकांत सांडगे, प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल, ज्येष्ठ प्रा. डॉ. प्रताप लाड उपस्थित होते.




**कुंडल : क्रांतिअग्रणी लाड महाविद्यालयाच्या सांडगेवाडी येथे सुरू असलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना 'क्रांती'चे अध्यक्ष शरद लाड.**

लाड म्हणाले, काही गोष्टी पुस्तकात शिकविल्या जातात. मात्र समाजात जगण्याचे तंत्र सेवा योजनेच्या श्रमसंस्कारामधून शिकविले जाते. शिबिरावेळी स्वच्छता करताना मनाचीही स्वच्छता होत असते. सांडगेवाडी ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी शिबिरासाठी मदत केली.

सुनील सांडगे म्हणाले, आमच्या गावाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून यासाठी आपल्या महाविद्यालयाचा खारीचा वाटा आहे.

प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत प्रा. भारती सुतार यांनी केले. आभार डॉ. धनंजय होनमाने यांनी मानले.

सूत्रसंचालन प्रा. स्वप्नाली लाड यांनी केले. यावेळी तानाजी शिंदे, सतीश शिंदे, अरुण शिंदे, गणेश भिंगारदिवे, किरण माळी, उत्कर्षा पवार, आशा सूर्यवंशी, शोभा सांडगे, दिनेश सूर्यवंशी उपस्थित होते.

शिबिरासाठी सहकार्य करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

दै. पुढारी
दि 03/01/2024

January 2024

दक्षिण महाराष्ट्र
केसरी

# विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाबरोबर श्रमसंस्कार शिबीरे महत्वाची

## शरद लाड : सांडगेवाडीत श्रमसंस्कार शिबीर संपन्न

केसरी वृत्तसेवा
कुंडल विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच श्रमाचे महत्व समजून घेणे गरजेचे असून याकरीता श्रमसंस्कार शिबिरे महत्वाची असल्याचे मत क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी.बापू लाड सह.साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड यांनी व्यक्त केले.

सांडगेवाडी(पलूस) येथे क्रांतिअग्रणी डा.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सांडगेवाडीचे सरपंच अमर वडार,उपसरपंच, सुनिल सुर्यवंशी,तंटामुक्तीचे अध्यक्ष शशिकांत सांडगे प्राचार्य डॉ.आर. एस.डुबल, प्रा.डॉ.प्रताप लाड उपस्थित होते.

शरद लाड पुढे म्हणाले काही गोष्टी पुस्तकात शिकविल्या जातात मात्र समाजात जगण्याचे तंत्र राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कारामधून शिकविले जाते. भारताचा सुजान नागरीक घडण्यासाठी श्रमसंस्कार शिबिरे महत्वाची आहेत. शिबिरावेळी स्वच्छता करताना मनाचीही स्वच्छता या शिबिराच्या माध्यमातुन होत असते.सांडगेवाडी ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी शिबिरासाठी मदत केली, असेच सहकार्य महाविद्यालयास पुढील काळातही रहावे.




सांडगेवाडी येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना चेअरमन शरद लाड.

सुनिल सांडगे म्हणाले, आमच्या गावाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून यासाठी आपल्या महाविद्यालयाचा खारीचा वाटा आहे. प्राचार्य डा. आर.एस.डुबल म्हणाले राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना श्रमाबरोबरच संस्काराचीही शिदोरी मिळते. प्रास्ताविक प्रा.भारती सुतार यांनी, आभार डॉ.धनंजय होनमाने यांनी तर सुत्रसंचलन प्रा.स्वप्नाली लाड यांनी केले.

यावेळी तानाजी शिंदे, सतिश शिंदे,अरुण शिंदे, गणेश भिंगारदिवे,किरण माळी, उत्कर्षा पवार, आशा सुर्यवंशी, शोभा सांडगे,.दिनेश सुर्यवंशी,अमोल पवार यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. श्रमसंस्कार शिबिरासाठी सहकार्य करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

### राष्ट्रीय शिबिरासाठी पायल जाधवची निवड

पायल जाधव हिची राष्ट्रीय सेवा योजनेचा गडचिरोली येथे होणाऱ्या राष्ट्रीय कँपसाठी निवड झाल्याने शरद लाड यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

दै केसरी
दि. 0४/09/202४

# January-February 2024

# कुंडल येथे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

वार्ताहर

कुंडल

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, मराठी शिक्षक संघ व क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय कुंडल आयोजित राष्ट्रीय चर्चासत्र शनिवार ३ व रविवार ४ फेब्रुवारी रोजी मराठी वाङ्मय इतिहासाचे पुनर्लेखन या विषयावर आयोजित केले आहे. या चर्चासत्राचे निमंत्रक प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. आ. अरुण लाड, जेष्ठ विचारवंत व्ही.वाय.पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रकांत रोकडे, खजिनदार गोविंद डुबल उपस्थित होते. डुबल पुढे म्हणाले, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव क्रांतिअग्रणींची जन्मशताब्दी व महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सावी वर्षाची सांगता याचे औचित्य साधुन हे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे.

चर्चासत्राचे उद्घाटन शनिवार सकाळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांचे हस्ते, प्रा. डॉ. रमेश पोळ व आ. अरुण लाड यांचे उपस्थितीत होत आहे.

आंबेडकरवादी व वंचित घटकांचे साहित्य फुले, आंबेडकरवादी मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे पुनर्लेखन, वंचित घटकांचे मराठी साहित्य व दिशा यावर या चर्चासत्राचा समारोप प्रा. गौतमीपुत्र कांबळे, क्रांती दूध संघाचे चेअरमन किरण लाड यांच्या उपस्थितीत होईल. या चर्चासत्रासाठी क्रांती कारखान्याचे चेअरमन शरद लाड, व्ही. वाय. पाटील, चंद्रकांत रोकडे, ॲड. प्रकाश लाड व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. प्रताप लाड, धनंजय होनमाने, नवनाथ गुंड, रमेश जंगम उपस्थित होते.

नवप्रभात 30/1/2024

---

सकाळ 30/1/2024

# जी. डी. बापू महाविद्यालयात ३, ४ रोजी राष्ट्रीय चर्चासत्र

**कुंडल, ता. २९ :** येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात शनिवारी (ता. ३) व रविवारी (४) 'मराठी वाङ्मय इतिहासाचे पुनर्लेखन' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केल्याची माहिती या चर्चासत्राचे निमंत्रक प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांनी दिली. आमदार अरुण लाड उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. डुबल म्हणाले, "स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव क्रांतिअग्रणींची जन्मशताब्दी व महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाची सांगता याचे औचित्य साधून हे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन शनिवारी सकाळी १०.३० वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते प्रा. डॉ. रमेश पोळ व आमदार अरुण लाड यांच्या उपस्थितीत होईल. चर्चासत्रामध्ये इतिहासाच्या पुनर्लेखनाची संकल्पना, मराठी वाङ्मय इतिहास पुनर्लेखनाचे प्रमाण व पुनर्लेखनाची गरज आदी विषयांवर चर्चा होणार आहे. रविवारी निबंध वाचन सत्र, धर्म सांप्रदायिक व बृहन्महाराष्ट्रातील मराठी वाङ्मय इतिहासाचे पुनर्लेखन, धर्माधिष्ठित मराठी वाङ्मय इतिहासाचे पुनर्लेखन, सांप्रदायिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे पुनर्लेखन आदी विषयांवर चर्चा होणार आहे. चर्चासत्राचा समारोप प्रा. गौतमीपुत्र कांबळे, क्रांती दूध संघाचे किरण लाड यांच्या उपस्थितीत होईल. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

---

# कुंडल येथे मराठी वाङ्मयावर चर्चासत्र

## अरुण लाड : ३ व ४ फेब्रुवारी रोजी आयोजन, शोधनिबंधांचे वाचन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कुंडल :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, मराठी शिक्षक संघ कोल्हापूर व क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय कुंडल आयोजित आंतर विद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र शनिवार, दि. ३ व रविवार, दि. ४ रोजी होणार आहे. 'मराठी वाङ्मय इतिहासाचे पुनर्लेखन' विषयावर हे राष्ट्रीय चर्चासत्र होत असल्याची माहिती आमदार अरुण लाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.



अरुण लाड

निमंत्रक प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल म्हणाले, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांची जन्मशताब्दी व महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाची सांगता याचे औचित्य साधून राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे.

उद्घाटन दि. ३ रोजी सकाळी १०:३० वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते व प्रा. डॉ. रमेश पोळ यांच्या उपस्थितीत होईल. चर्चासत्रात इतिहासाच्या पुनर्लेखनाची संकल्पना या विषयावर चर्चा होईल. तिसऱ्या सत्रात प्राध्यापकांचे शोधनिबंध वाचन, शाहिरी वाङ्मय आदींवर चर्चा होणार आहे. निबंध वाचन, काव्य मैफील कार्यक्रम होणार आहेत.

रविवारी निबंध वाचन होईल. चौथ्या सत्रात धर्म सांप्रदायिक व बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्याच्या वाङ्मय पुनर्लेखन आदींवर चर्चा होणार आहे. पाचव्या सत्रामध्ये आंबेडकरवादी व वंचित घटकांचे साहित्य फुले, आंबेडकरवादी मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे पुनर्लेखन, वंचित घटकांचे मराठी साहित्य व दिशा यावर चर्चा होईल. यावेळी व्ही. वाय. पाटील, चंद्रकांत रोकडे, गोविंद डुबल प्रमुख उपस्थित होते.

दै. लोकमत 3/2/24